लोकमत

# युवकांमध्ये वैचारिक बदल घडायला हवे

## एसडीपीओ पांडे : शांतता समीतीची बैठक उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कारंजा लाड :** समाजात शांतता प्रस्थापित होण्यासाठी, सामाजिक सलोखा निर्माण होण्याकरिता प्रामुख्याने युवकांमध्ये वैचारिक बदल घडायला हवे, असे प्रतिपादन येथे नव्यानेच रुजू झालेले उपविभागीय पोलीस अधिकारी जगदीश पांडे यांनी १६ फेब्रुवारी रोजी केले.

येत्या १९ फेब्रुवारीला सर्वत्र शिवजयंती साजरी होणार आहे. यादरम्यान शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी शहर पोलीस ठाण्यात पार पडलेल्या शांतता समितीच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी ठाणेदार आधारसिंग सोनोन, तहसिलदार धीरज मांजरे यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. कायदा सर्वांसाठी समान असून शिवजयंती उत्सवात नागरिकांनी नियमांचे पालन करावे, असे आवाहन याप्रसंगी तहसिलदार मांजरे यांनी केले. याप्रसंगी शांतता समितीच्या पदाधिकाऱ्यांसह लोकप्रतिनिधी व इतर नागरिकांची उपस्थिती होती.



शांतता समितीच्या सभेत मार्गदर्शन करताना एसडीपीओ पांडे, सभेला उपस्थित कारंजा शहरातील नागरिक.